Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# "कोरोना 2020 काळामध्ये माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर डिजिटल शिक्षण पद्धतीचा होणारा परिणाम."

**प्रा. जयपालसिंह डी. परमार**
संशोधक

## सारांश

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामध्ये काळाच्या ओघात बदल होत जाणं हे सुदृढ शिक्षण प्रणालीचे लक्षण आहे. हे लक्षात घेऊन प्रचलित शिक्षण पद्धतीत काल सुसंगत बदल करत राहणं गरजेचं आहे. तसे बदल होत असले तरी त्याची गती वाढण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने सर्व घटकांचे एकत्रित प्रयत्न गरजेचे ठरणार आहेत. शिक्षण प्रक्रियेत एक एक मूल घडविणे म्हणजे बंदरात जहाज बांधण्यासारखे आहे. कोणतेही बांधले जाणारे जहाज बंदरात सर्वात सुरक्षित असतं. परंतु त्याची रचनाच सागरात जाण्यासाठी करण्यात आलेली असते. त्यानुसार या विद्यार्थ्यांच्या नौकेला 21 व्या शतकात कुठली दिशा द्यायची, तिला कुठल्या वादळांचा, आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. याचा विचार करून त्या संदर्भात तयारी करून घेणे हे आजच्या शिक्षण पद्धतीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे.मनुष्य जीवनात ज्ञान,कौशल्ये आणि समजूतदारपणा आणण्यात शिक्षणाचा मोठा मोलाचा वाटा असतो . शिक्षण लोकांना चांगले नागरिक बनविन्यास शिकवते. मातीच्या गोळ्याच्या खडूपासून,धूळपाट्या, लाकडीपाट्या ते ब्लॅकबोर्ड ( फळे )ग्रीन बोर्ड, व्हाईट बोर्ड, डिजिटल बोर्ड पर्यंत शिकवण्याच्या विविध साधनांची क्रांती झालेली आहे. याबरोबरच अध्यापनाच्या पद्धतीतही मोठ्या सुधारणा झालेल्या आहेत. त्यामुळे शिक्षण अधिक मनोरंजक व सुलभ झाले आहे. गेल्या काही वर्षात पारंपारिक शिक्षणाची संकल्पना मोठ्या प्रमाणात बदल ली आहे. आपण आता डिजिटल आणि ऑनलाईन शिक्षणाच्या नवीन विज्ञान युगात प्रवेश करीत आहोत.

**मुख्य शब्द –** माध्यमिक स्तरावरील शिक्षणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर डिजिटल शिक्षणाचा परिणाम.

आता शिक्षण घेणारी (सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा अन्वये) मुलं 2030 मध्ये पदवीधर होणार आहेत. त्यावेळी विविध क्षेत्रात काय बदल झालेले असतील, कोणतं प्रगत तंत्रज्ञान अस्तित्वात येईल ,आणि त्या दृष्टीने कोणत्या नवीन संधी उपलब्ध होतील ,त्यासाठीचे निकष काय असतील, त्या वेळच्या विद्यार्थ्यांच्या गरजा काय असतील, याचा विचार करून आजची शिक्षण प्रक्रिया राबवली जाण्याची आवश्यकता आहे . खरं तर हे सारे मुद्दे लक्षात घेऊन शिक्षणाची रचना ठरवणं अवघड किंबहुना, आव्हानात्मक आहे. त्या दृष्टीने आपण आजच्या शिक्षणाकडे पूर्वीच्या मानसिकतेतून पाहणार आहोत का ? हा खरा प्रश्न आहे . त्यामुळे डिजिटल शिक्षण पद्धतीचा अवलंब करता असताना नाविन्यपूर्ण शैक्षणिक साधनांचा वापर सुकर करण्यासाठी, देशभरातील डिजिटल पायाभूत सुविधांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. परंतु डिजिटल शिक्षणाच्या नकारात्मक बाजू ही आपणास पाहायला मिळाल्या म्हणून मग कृती युक्त शिक्षण व डिजिटल शिक्षण यातील तुलना करून योग्य त्या शिक्षण पद्धतीचा अवलंब करता यावा. संबंधित साहित्याचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की,

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

भारतातील डिजिटल शिक्षण, डिजिटल शिक्षणातील आव्हाने टी.आर. (T.R.)लर्निंग व डिजिटल शिक्षण यातील तुलना पारंपारिक शिक्षण व डिजिटल शिक्षण यामधील तुलना अशा अनेक विषयात डिजिटल शिक्षणासंबंधी खालील मुद्द्यांचे अवलोकन करावे.

माध्यमिक स्तरावरील शिक्षणाची सद्यस्थिती काय आहे.

माध्यमिक स्तरावरील डिजिटल शिक्षणाची सद्यस्थिती काय आहे.

डिजिटल विविध प्रकारची संशोधने झालेली आहेत. परंतु डिजिटल शिक्षणाचा अभ्यास झालेला नाही. माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांवर डिजिटल शिक्षणाचे परिणाम यावर सुद्धा संशोधन झालेले नाही. म्हणून या ठिकाणी हा विषय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. प्रत्येक मुलांना शिक्षण देणे हे बालकाच्या मोफत व सक्तीचे शिक्षण आर.टी.ई.ऍक्ट 2009, आर.पी.डब्ल्यू.डी. 2016 या कायद्याने प्रत्येक मुलाला शिक्षण घेण्याचा मूलभूत हक्क मिळाला आहे. पायाभूत चाचणी प्रश्न पत्रिकेतील अनुकूल करण्यासाठी प्रथमता अध्ययनार्थी चा दृष्टिकोन ज्ञात असणे आवश्यक आहे. परीक्षा सवलती व शासन निर्णय. माध्यमिक स्तरावरील शिक्षणाच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर डिजिटल शिक्षण याचा परिणाम अभ्यासण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून व शैक्षणिक दृष्टीकोनातून समजूनघेण्यासाठी शिक्षणाच्या विविध साधनांचा अभ्यास कशा पद्धतीने करावा.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर डिजिटल शिक्षणामुळे होणाऱ्या परिणाम कशाप्रकारे होतो.

माध्यमिक स्तरावरील डिजिटल शिक्षणाच्या मार्गात येणाऱ्या विविध अडचणी यांचा अभ्यास करणे व त्यावर उपाययोजना सुचवणे.

उपरोक्त माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर डिजिटल शिक्षणाचा व डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनाचा विकास होतो. डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन सहभाग सकारात्मक होतो.

डिजिटल शिक्षण हे पारंपरिक शिक्षणापेक्षा अधिक परिणामकारक आहे याची तुलना करणे आवश्यक आहे. डिजिटल शिक्षणाच्या विविध साधनांचा शिक्षक व विद्यार्थ्यांनी वापर करणे व अभ्यास करणे. माध्यमिक स्तरावरील डिजिटल शिक्षणाची सद्यस्थिती काय आहे व त्याबाबत वैज्ञानिक दृष्टिकोन काय आहे. यासाठी विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन व परीक्षा विषयी गट साधन केंद्रातील समावेशित शिक्षण व रिसोर्स सेंटर यांचे मार्गदर्शन घ्यावे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस पूरक ठरणाऱ्या सवलती देणे बंधनकारक आहे. माध्यमिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर डिजिटल शिक्षणाचा सकारात्मक परिणाम होण्यासाठी सोयी सवलती देण्यामागील मुख्य उद्देश- माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांच्या डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून मिळणारे शिक्षण अधिक प्रभावशील असणे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन व परीक्षा पद्धतीमध्ये काही सोयी सवलती देऊन त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे व डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थी एकाग्रचित्त होणे. तसेच त्यांचे शिक्षण प्रभावी व गुणवत्ता पूर्ण, व मनोरंजक व्हावे हा मुख्य उद्देश आहे. शासन निर्णय 15 फेब्रुवारी 2016 व 11 जानेवारी 2017 तसेच 20 मार्च 2020 नुसार माध्यमिक स्तरावतील विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील राज्य मंडळाच्या सर्व विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालक व शिक्षकां चा समावेश आहे. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोनातून अध्ययन आर्थिक कोणत्या शैलीन शिकतो त्यानुसार विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन माध्यमिक वर्ग शिक्षकांनी त्याबाबतचे अनुकुळण करावे.

## विशेष नोंदी

खालील प्रश्न हे नमुना प्रश्न आहेत प्रत्येक मुलाची गरज वेगळी आहे.ते ओळखून आवश्यकतेनुसार शासन निर्णयाचा आधार घेऊन डिजिटल शिक्षणाचे अनुकूलन करावे यासाठी काही नमुना प्रश्न खालील प्रमाणे.

शैक्षणिक संपादन - विद्यार्थ्यांना प्राप्त होणारे परीक्षेतील गुण किंवा प्राप्तांक म्हणजेच शैक्षणिक संपादन होय.

डिजिटल शिक्षण - आधुनिक तंत्रज्ञानाचा व साधनांचा उपयोग करून प्रभावीपणे दिले जाणारे शिक्षण म्हणजेच डिजिटल शिक्षण होय.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

विद्यार्थी-विद्या ग्रहण करणारा म्हणजेच विद्यार्थी होय.

परिणामांचा अभ्यास- शैक्षणिक संपादनात डिजिटल शिक्षणाने पडलेला फरक कोणता याबाबत विश्लेषण.

माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचे फायदे व महत्त्व- महाराष्ट्रातील राज्य मंडळाच्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील डिजिटल शिक्षणासंबंधीत शैक्षणिक

संपादन शोधण्यासाठी विद्यार्थ्यांकरीता विविध तज्ञांचे मार्गदर्शन घेऊन प्रश्नावली तयार करणे प्रश्नावलीचे प्रमाणीकरण करणे तसेच या प्रश्नावलीची विश्वासनीयता आणि वैधता तपासणे शिवाय पथदर्शक अभ्यास करून परिणाम, व त्यातून मिळणारा शैक्षणिक आनंद हा अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा पद्धतीने माध्यमिक स्तरावरील इयत्ता निहाय विषयनिहाय विद्यार्थ्यांची अध्ययन शैली ओळखून व गरज लक्षात घेऊन उपरोक्त डिजिटल शिक्षण आलेल्या अडचणी दूर करण्यात विद्यार्थ्यांना मदत करणे व त्यानंतर अंतिमतः विद्यार्थ्यांकडून आवश्यक असलेल्या तथ्यांचे संकलन करण्यासाठी प्रश्नावली चा वापर करणे व पालकांना या शैक्षणिक व्यवस्थेत समाविष्ट करून घेणे व शिक्षकांना नवनवीन तंत्रज्ञानाच्या बाबत प्रशिक्षण देणे. माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांना 21 व्या वैज्ञानिक युगात डिजिटल पद्धतीने शिक्षण – विद्यार्थ्यांसाठी जास्त बदल करण्याची आवश्यकता नाही मात्र आवश्यकता असेल तर नवनवीन डिजिटल शैक्षणिक माध्यमे उपलब्ध करून देण्यात यावे तसेच नवनवीन उपकरणे विद्यार्थ्यांना हाताळण्याचे ट्रेनिंग देणे प्रात्यक्षिक परीक्षा एवजी तोंडी परीक्षा अशा काही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. शासन निर्णय 16 ऑक्टोबर 2018 चा आधार यासाठी घेण्यात यावा शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या गरजेचा विचार करून व पालक वर्गशिक्षक यांच्याशी चर्चा करून अंतिम निर्णय घ्यावा यासाठी विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन व परीक्षा विषयी आवश्यकता असल्यास गटसाधन केंद्रातील रिसोर्स सेंटर यांचे मार्गदर्शन घ्यावे. तसेच नाविन्यपूर्ण शैक्षणिक साधनांचा डिजिटल माध्यमांचा वापर सुकर करण्यासाठी देशभरातील डिजिटल पायाभूत सुविधांची गुणवत्ता सुधारण्यासाठी शासनाद्वारे प्रयत्न केले जात आहेत परंतु डिजिटल शिक्षणाच्या नकारात्मक बाजू ही आपल्याला पाहायला मिळाले आहेत म्हणून मग कृतीयुक्त शिक्षण व डिजिटल शिक्षण यातील तुलना करून योग्य त्या शिक्षण पद्धतीचा अवलंब करता यावा. पारंपरिक शिक्षण व डिजिटल शिक्षण यामधील तुलना अशा अनेक विषयात डिजिटल शिक्षणासंबंधी संशोधने झालेली आहेत माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांवर डिजिटल शिक्षणाचे पद्धतीने विद्यार्थ्या च्या गरजेनुसार मनोरंजक शिक्षण पद्धतीचा अवलंब करता येईल.

Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985